# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/1918

दिनांक :- 13 JUL 2023

प्रति,

प्राचार्य,
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/Intake Approval/२०२३/४४४ दिनाक १३जुन २०२३.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/१६५२ दिनांक १४ जुन २०२३.
३. विकाअ/शिक्षण/२०२३/१७०९ दिनांक २२ जुन २०२३.
४.विकाअ/शिक्षण/२०२३/१९०६ दिनांक १२ जुलै २०२३.
५. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/Intake Approval/२०२३/५७२ दिनाक १२ जूलै २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदवीका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी होणा-या संस्थांनी आवश्यक कागदपत्रे सादर करुन अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेची माहीती अचूक व अद्ययावत करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २, ३ अन्वये आपणास कळविलेले आहे. तसेच संदर्भ ४ अन्वये ज्या संस्थांनी माहीती अपडेट करुन या कार्यालयाचे लॉगीनमधुन Approve (पडताळणी) केलेली आहे अश्या संस्थांनी संस्थेच्या लॉगिनमधून सदर माहीती बरोबर आहे किंवा नाही याची तपासणी करावी व त्यामध्ये काही तफावत असल्यास तसे कळविण्यात यावे तसेच त्यामध्ये काही त्रृटी नसल्यास त्याबाबत सुध्दा पत्राव्दारे कळवावे. आपण तसे न कळविल्यास सदर माहीती बरोबर असल्याचे गृहीत धरुन तसे तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना या कार्यालयाव्दारे कळविण्यात येईल.

तसेच असे निदर्शनास आले की, काही संस्थांनी सदर माहिती अद्यापही अद्ययावत केलेली नसल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती ही संवेदनशील, कालमर्यादेत करणे गरजेचे असल्याने संबंधीत संस्थांनी **दिनांक १५ जूलै २०२३** पर्यंत या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून ऑनलाईन पध्दतीने अप्रुव्ह करण्याकरीता अंतिम संधी देण्यात येत असल्याबाबत मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भीय पत्र क्रमांक ५ अन्वये कळविलेले आहे,

तेव्हा सदर माहीती वरील नमुद कालावधीत या कार्यालयात उपस्थित राहुन ऑनलाईन अप्रुव्ह करुन घ्यावे, वरील कालावधीत अप्रुव्ह न केल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधीत संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

**(म.म. अंधारे)**
सहा.संचालक(तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळार प्रदर्शित करण्यासाठी.